# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४

दूरध्वनी क्र.:-०२०- 29709617/29709396 वेबसाइट:-mscepune.in ई-मेल :-mscegcctbc@gmail.com

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ.१/मा.अ./२०२५/ 4934
दिनांक :- ३० / ०९ / २०२५.

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प. (सर्व).
३. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई ( उ/ द/ प).

**विषय :- टंकलेखन संस्थांच्या नविन मान्यता, स्थलांतरण, हस्तांतरणाबाबत मार्गदर्शन सुचना..**
**संदर्भ :-** महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ च्या सुधारीत नियमावली २०२३.

संदर्भीय नियमावलीनुसार राज्यामध्ये टंकलेखन संस्थांना नवीन मान्यता, स्थलातंरण, हस्तांतरण याबाबतची मंजुरी शासन स्तरावरुन देण्यात येत असते. तथापि शासनाकडून प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर स्थानिक पातळीवर विविध नजीकच्या टंकलेखन संस्थांना सदर बाब माहित नसल्यामुळे अंतराबाबत नव्याने तक्रारी प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. प्रस्ताव सादर करताना कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

१. संगणक टंकलेखन संस्थांचे नवीन मान्यता, स्थलांतरण, हस्तांतरण याबाबतचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे सादर केल्यानंतर व त्याची स्थानिक पातळीवर तपासणी केल्यानंतर, अशा प्रकारचे सर्व प्रस्ताव जिल्हा समन्वय समिती समोर ठेवायचे आहेत. या समितीमध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व त्यांचे अधिनस्त उपशिक्षणधिकारी यांचे सह महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन, संगणक टायपिंग शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई या संस्थेचे जिल्हयातील जिल्हा प्रतिनिधी, जिल्हाध्यक्ष व जिल्हा सचिव यांचा समावेश असेल. शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेले प्रस्तावांबाबत या समितीमध्ये सविस्तर चर्चा करणे बंधनकारक राहील. यामध्ये संघटनेकडून काही आक्षेप/ तक्रारी प्राप्त झाल्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सखोल पडताळणी करुन त्यांचे निराकरण करावयाचे आहे. जर जिल्हा संघटनेच्या आक्षेप/तक्रारींमध्ये तथ्य नसेल, तर प्रस्ताव फेटाळण्यात यावा. परंतु पडताळणीअंती समन्वय सभेच्या सदस्यांच्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून न आल्यास, प्रस्ताव सादर करतांना त्यामध्ये आक्षेप व त्यावरील खुलाशाचा उल्लेख करुन मंजुरीसाठी विभागीय उपसंचालक यांच्याकडे सादर करावयाचा आहे. सदर बाब अमलात आणल्यास स्थानिक स्तरावरील तक्रारींचे आपोआपच निरसन होईल व पर्यायाने पारदर्शक, अचूक व परिपूर्ण प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर होतील.
२. स्थलांतरणासंदर्भात 'जुन्या संस्थांना हे नियम लागू होणार नाहीत' असा उल्लेख नियमावलीत करण्यात आलेला आहे. तथापि त्याचा चुकीचा अर्थ क्षेत्रीय स्तरावर काही ठिकाणी घेण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे. या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, जर एखादया अस्तित्वात असलेल्या संस्थेला स्थलांतरित करावयाचे असेल व ती आजरोजी जवळील संस्थेपासून शंभर ते पाचशे मीटरच्या आत मध्ये असेल, तर अशा संस्थेला त्याच परीसरात संस्था स्थलांतरीत करण्यासाठी सदर अट लागू होणार नाही. मात्र या संस्थेला वेगळया क्षेत्रामध्ये, कॉलनीमध्ये, प्रभागांमध्ये स्थलांतरण करावयाचे असेल, तर मात्र त्या ठिकाणच्या संस्थांपासून या प्रस्तावित संस्थेच्या ठिकाणाचे अंतर, हे शहरी व ग्रामीण भागासाठी नियमावलीत नमूद केलेल्या ५०० किंवा १००० मीटर पेक्षा जास्त असायला हवे.
३. स्थलांतरणासाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांबाबत शिफारस करण्यापूर्वी खालील मुद्दयांची पडताळणी करणे गरजेचे आहे -
   १. संस्था स्थलांतरणाचे कारण स्पष्ट व संयुक्तीक असल्याची खात्री करावी.

c:/other letter

२. जागेची तपासणी करताना मोकळया जागेची करावी, तेथे संगणक सेटअप असण्याची आवश्यकता नाही.
३. जागेचा नकाशा व फोटो सादर करताना मोकळया जागेचा करावा.फोटो हा Geo Location (GPS) आधारीत असणे अनिवार्य राहील.
४. संस्थेस मान्यता मिळाल्यापासून किमान ५ वर्षे स्थलांतरण करता येणार नाही.
५. सर्वात महत्वाचे म्हणजे संस्थांना शासनाकडून मान्यता आल्याशिवाय स्थलांतरणाची कार्यवाही करता येणार नाही.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे प्रस्ताव सादर करणे म्हणजे स्थलांतरणास मान्यता मिळाली असा अर्थ होत नाही याची सर्व संस्थांनी गंभीरतेने नोंद घ्यावी. असे केल्याचे आढळल्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सदर संस्थांवर नियमानुसार कारवाई करावी. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी स्थलांतरणाचा प्रस्ताव संस्थांकडून प्राप्त होताच त्यावर दोन आठवडयात कार्यवाही पूर्ण करुन पुढील कार्यवाहीस्तव सादर होतील याबाबत दक्षता घ्यावी.

स्थलांतरणाचा आदेश नसेल, केवळ प्रस्ताव दाखल केलेला आहे, या सबबीवर नविन ठिकाणी बेकायदेशीररित्या स्थलांतरीत झालेल्या संस्थांनी सदर आदेशापासुन सात दिवसांच्या आत आपली संस्था मुळ ठिकाणी नेण्याची कार्यवाही करावी. तसे न केल्यास, विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी त्वरीत संबंधित संस्थेची मान्यता स्थगित करण्याबाबत आदेश पारीत करावा. बेकायदेशीररित्या स्थलांतरीत केलेल्या संस्थांची यादी सात दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावी.

या कार्यालयाच्या **राज्य समिती बैठक दि.०७/०७/२०२५ रोजीच्या ठराव (ठराव क्र. ६७३)**पत्रान्वये स्थगित केलेले स्थलांतरण प्रस्ताव वरील सर्व सूचनांचा अवलंब करुन पुढील कार्यवाहीस्तव सादर करावेत.

30/9/25

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे ०४.**

**प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीसाठी :-**
१. कार्यासन अधिकारी, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
२. सर्व संस्थाचालक.

c:/other letter